**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची इटलीमध्ये विविध देशांच्या नेत्यांसोबत द्विपक्षीय चर्चा
- नीट परीक्षेतल्या कथित गैरव्यवहारांची सीबीआयमार्फत चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाकडून राष्ट्रीय परीक्षा संस्था आणि केंद्र सरकारला नोटीस
- हज यात्रेला आजपासून सुरुवात, जगभरातले सुमारे २० लाख भाविक सौदी अरेबियात दाखल

**आणि**

- मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव उद्यापासून, यामुळं देशातल्या कलाकारांना जागतिक व्यासपीठ मिळेल, असं माहिती प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांचं प्रतिपादन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इटलीमधे अपुलिया इथं आज विविध राष्ट्रांच्या प्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा केली. जी सेव्हन देशांच्या शिखर परिषदेसाठी मोदी सध्या इटलीत आहेत. आज दुपारी त्यांनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांच्याशी चर्चा केली. संरक्षण, अंतराळ, शिक्षण, हवामान बदल, पायाभूत सुविधा, उर्जा, क्रीडा इत्यदी क्षेत्रातल्या परस्पर सहकार्याविषयी त्यांची चर्चा झाली. जागतिक आणि क्षेत्रीय महत्त्वाच्या मुद्द्यांवरही उभय नेत्यांमधे विचारांची देवाण घेवाण झाली. पुढच्या वर्षी फ्रान्समधे होणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक संमेलन आणि संयुक्त

राष्ट्रांच्या महासागरविषयक परिषदेच्या अनुषंगानं, अद्ययावत तंत्रज्ञान विषयक सहकार्य वाढवण्यावर दोघांचं एकमत झालं. पॅरिसमधे होऊ घातलेल्या ऑलिंपिक आणि पॅरा ऑलिंपिक क्रीडास्पर्धांच्या आयोजनासाठी मोदी यांनी मॅक्राँ यांना शुभेच्छा दिल्या. जी सेव्हन देशांच्या प्रमुखांबरोबरही मोदी द्विपक्षीय चर्चा करत आहेत.

ब्रिटनचे प्रधानमंत्री ऋषी सुनक यांच्याबरोबर संवाद झाल्याचं, तसंच ब्रिटन बरोबर सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी वाढवण्यासाठी रालोआ सरकार आपल्या तिसऱ्या कार्यकाळात सज्ज असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. सेमीकंडक्टर, आणि इतर तंत्रज्ञान तसंच व्यापार आणि संरक्षण क्षेत्रात उभयपक्षी संबंध दृढ करण्याविषयी दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशीही प्रधानमंत्र्यांची चर्चा झाली. उभयपक्षी हिताच्या मुद्दयांवर बातचीत झाल्यावर युक्रेनमधल्या परिस्थिती वर तसंच स्वित्झर्लंड मधे होऊ घातलेल्या शांती परिषदेवर त्यांनी विचार विनिमय केला. युक्रेनमधल्या सध्याच्या संघर्ष स्थितीबद्दल भारताचा दृष्टिकोन मानवतेचा असून चर्चा आणि संवादाच्या मार्गानेच तोडगा निघेल अशी भारताची धारणा असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

पोप फ्रान्सिस यांचीही प्रधानमंत्र्यांनी इटलीमध्ये भेट घेतली.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्लीत गृह मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेत जम्मू-काश्मीरच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला. अमरनाथ यात्रेच्या तयारीचा आढावा आणि त्या पार्श्वभूमीवर राज्यातील सुरक्षा

व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी येत्या रविवारी १६ जूनला सविस्तर बैठक घेण्याच्या सूचना गृहमंत्री शहा यांनी आज दिल्या आहेत.

या बैठकीला जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, केंद्रीय गृहमंत्रालयाचे सचिव, लष्कराचे वरीष्ठ अधिकारी, पोलिस, जम्मू आणि काश्मीर प्रशासन आणि गृह मंत्रालयाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

भारताच्या घाऊक मूल्य निर्देशांकांवर आधारित चलनवाढ मे महिन्यात २ पूर्णांक ६१ शतांश टक्के वाढल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे. गेल्या पंधरा महिन्यातली ही सर्वाधिक चलनवाढ आहे. नैसर्गिक वायू, कच्चे तेल, खनिज तेल, अन्नपदार्थ यांच्या किमती वाढल्यामुळे ही चलनवाढ झालेली असेल, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने म्हटलं आहे. मे महिन्यात अन्नपदार्थांच्या किमती ७ पूर्णांक ४ दशांश टक्के तर भाजीपाल्याच्या किमती ३२ पूर्णांक ४२ शतांश टक्के इतक्या वाढल्या आहेत.

**<><><><><>**

वैद्यकीय आणि दंत वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेत पेपरफुटी आणि अन्य गैरप्रकार झाल्याचा आरोप करत त्याची चौकशी केंद्रीय अन्वेषण संस्थेमार्फत करण्याची मागणी करणाऱ्या विविध याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय परीक्षा संस्था तसंच केंद्र सरकारला नोटिसा बजावल्या आहेत. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या सुट्टीकालीन पीठाने सीबीआय आणि बिहार राज्यसरकारकडूनही जबाब मागितला असून त्याकरता दोन आठवड्यांची मुदत दिली आहे.

नीट ची परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थींच्या हिताला धक्का पोहोचणार नाही याची काळजी केंद्र सरकार घेईल, असं आश्वासन आज केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलं. विद्यार्थ्यांच्या समस्या समभावाने आणि सुयोग्य पद्धतीने सोडवू असं ते म्हणाले. सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ठ असून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशनानुसार केंद्र सरकार कार्यवाही करेल, असंही ते म्हणाले. दरम्यान, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सरकारवर कडक शब्दात टीका केली आहे. २४ लक्ष विद्यार्थ्यांच्या आशा सरकारनं धुळीला मिळवल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवर टाकलेल्या पोस्ट मध्ये म्हंटल आहे.

<><><><><>

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना बहुतांश दावे ३ दिवसात निकाली काढत आहे. शिक्षण, आजार, विवाह तसंच घर खरेदीकरिता मागितलेल्या १ लाख रुपयांपर्यंतच्या हंगामी कर्जांचं वितरण करण्यासाठी नवीन स्वयं चलित प्रणाली सुरू केल्याची माहिती संघटनेनं दिली आहे. या माध्यमातून २५ लाख प्रकरणं मार्गी लागली आहेत. आजारपणासाठी घेतलेल्या कर्जांचे अर्ध्याहून अधिक अर्ज निकाली काढल्याचंही संघटनेनं कळवलं. केंद्रीय कामगार सचिव सुमिता दावरा यांनी आज कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या कार्यप्रणालीत सुधारणा करण्यासाठी आढावा बैठक घेतली.

<><><><><>

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन २७ जून ते १२ जुलै या कालावधीत मुंबईत होणार आहे. या अधिवेशनात २८ जून रोजी राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. या अधिवेशनाचं कामकाज १३ दिवस चालणार आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत आज

हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार उपस्थित होते.

**<><><><>**

नवी दिल्लीतल्या अंमली पदार्थ विरोधी विशेष पथकानं आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थांची तस्करी करणार रॅकेट पकडलं असून त्यांच्याकडून २० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केली. याप्रकरणातील दोन मुख्य सुत्रधारांना अटक केली असून त्यातील एक नायजेरियाचा तर दुसरा आयवरी कोस्टचा असल्याचं विशेष पथकानं प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितलं.

या दोघांकडून सुमारे सहा किलो मेथमफेटामाइन हा अंमली पदार्थ जप्त केल्याचंही पत्रकात नमूद केलं आहे. हे दोघेही बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतात वास्तव्य करत असल्याचं तपासातून पुढं आलं असून त्यांच्याविरोधात परदेशी कायद्याचं उल्लंघनाचा गुन्हा दाखल केला आहे.

**<><><><>**

कुवैत इथल्या आगीत होरपळून मृत्युमुखी पडलेल्या ४५ भारतीयांचे पार्थिव भारतीय हवाई दलाच्या विशेष विमानानं मायदेशी आणण्यात आले. हे विमान अगोदर कोची विमानतळावर उतरवण्यात आलं आणि तिथून ते नवी दिल्लीला रवाना झालं.

आगीच्या त्या ठिकाणी १७६ भारतीय कामगार कार्यरत होते, त्यापैकी ४५ जणांचा मृत्यू ओढवला तर ३३ जण गंभीर जखमी झाले. जखमींना व्यवस्थित उपचार मिळावेत तसंच घटनेमुळे विस्थापित झालेल्यांना मायदेशी सुरक्षितपणे

परतता यावं यासाठी  परराष्ट्र व्यवहार मंत्रालय कुवैती अधिकाऱ्याच्या सतत संपर्कात आहे.

<><><><><>

हजच्या ५ दिवसीय यात्रेला आजपासून सुरुवात झाली आहे. यानिमित्त सौदी अरेबियातल्या मीना शहरात आज जगभरातले सुमारे २० लाख भाविक जमा झाले आहेत. हे यात्रेकरू आज मीना शहरातच मुक्काम करणार असून उद्या पहाटे ते अराफतकडे मार्गक्रमण करणार आहेत.  सौदी अरेबियात गोळा झालेल्या २० लाख भाविकांमध्ये पावणे २ लाख भारतीयांचा समावेश आहे. त्यापैकी १ लाख ४० हजार २० हज कमिटीच्या माध्यमातून तर ३५ हजार यात्रेकरू खाजगीरित्या गेले आहेत. विशेष म्हणजे या भारतीय भाविकांमध्ये ५ हजार महिलांचाही समावेश असून त्या कोणत्याही पुरुष सोबतीशिवाय यात्रेत सहभागी झाल्या आहेत.

<><><><><>

मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामुळं देशातल्या कलाकारांना जागतिक व्यासपीठ मिळेल. भारतात ॲनिमेशन चित्रपट, माहितीपट आणि लघुपट निर्मिती क्षेत्रांतही मोठी संधी आहे, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज केलं. या महोत्सवाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत ते मुंबईत बोलत होते. माहितीपट हा एक प्रचंड मोठा उद्योग आहे. माहितीपटांच्या माध्यमातून मनोरंजनासह स्वतःकडे आणि समाजाकडे पाहता येतं, या महोत्सवामुळं कलेच्या प्रसारासोबतच समाजातले विविध मुद्दे सर्वांसमोर येतील आणि त्यावर पर्याय काढायला यामुळं मदत होईल, असंही ते म्हणाले.

//<><><><><>//